※ प्रकरण तिसरे ※

# संशोधन समस्या आणि संशोधनाचा आराखडा

## (Research Problem and Research Design)

✲ प्रकरण तिसरे ✲

# संशोधन समस्या आणि संशोधनाचा आराखडा

## (Research Problem And Research Design)

**प्रास्ताविक** (Introduction) -

या प्रकरणात प्रस्तुत अभ्यासासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचे विवेचन करण्यात आले आहे. संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधन क्षेत्र, शहरी भागातील महिला बचत गटांची नमुना निवड, ग्रामीण भागातील महिला बचत गटांची निवड, तथ्य संकलनासाठी वापरलेले तंत्र, तथ्य संकलन, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण, संशोधनाच्या मर्यादा आणि प्रकरणाची रूपरेषा या संशोधन आराखडयाच्या विविध पैलूंचे विवेचन या प्रकरणात करण्यात आले आहे.

**१. संशोधन विषयाची निवड** (Selection of the Research Topic) -

''स्वयं-सहाय्य बचत गट आणि महिलांचा विकास : मिरज तालुक्यातील बचत गटांचा समाजशास्त्रीय अभ्यास'' हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. हा विषय निवडण्याची दोन कारणे आहेत. संशोधकर्ती एम.ए.स्तरावरील अभ्यास करीत असताना ''स्त्री आणि समाज'' (Women & Society) हा ऐच्छिक विषय (Optional Paper) निवडला होता. या विषयाच्या अभ्यासावरून समाजातील स्त्रियांची स्थिती काय आहे? विविध क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग कसा वाढत आहे याची जाणीव झाली, त्यामुळे स्त्रियांविषयीच्या अभ्यासात संशोधनकर्तीस अभिरूची निर्माण झाली.

संशोधनकर्ती स्वतः मिरज शहराची रहिवासी आहे. मिरज तालुक्यात 'एकात्म समाज केंद्र' यांच्या मार्फत सुरू असणारे स्वयं-सहाय्य महिला बचत गट. या महिला बचत गटाच्या सहकारामुळे त्यांच्या आर्थिक बचतीतून बँकेकडून कर्ज घेऊन त्या वेगवेगळे उद्योगधंदे करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनात बदल घडून येत आहे, हे संशोधकर्तीच्या निदर्शनास आले. त्यामुळे प्रस्तुत विषयाचा पध्दतशीर अभ्यास करावा असे वाटले म्हणून संशोधनकर्तीने हा विषय संशोधनासाठी निवडला. साहित्य परिशीलनासाठी (Review of Literature) सदर विषयावर आधीच्या संशोधकांनी काही संशोधन केले आहे

का? या विषयाचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधिकेने केला. "स्वयं-सहाय्य बचत गट आणि महिलांचा विकास" या विशिष्ट विषयावर करण्यात आलेले समाजशास्त्रीय संशोधन प्रस्तुत संशोधिकेला आढळले नाही. त्यामुळे अन्वेषणात्मक (Exploratory) स्वरूपाचे संशोधन करण्याचे संशोधिकेने ठरविले.

**२. संशोधन समस्या** (The Research Problem) -

"स्वयं-सहाय्य बचत गट आणि महिलांचा विकास : मिरज तालुक्यातील बचत गटांचा समाजशास्त्रीय अभ्यास". असा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे.

**३. संशोधनाची उद्दिष्टये** (Objectives of the study) -

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली -

(१) स्वयं-सहाय्य बचत गटांमधील महिलांच्या सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.

(२) शहरी आणि ग्रामीण भागातील महिला बचत गटांचा तुलनात्मक अध्ययन करणे.

(३) स्वयं-सहाय्य बचत गटांचा महिलावर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे.

**४. संशोधन क्षेत्र** (Field of Empirical Observation)-


"स्वयं-सहाय्य बचत गट आणि महिलांचा विकास : मिरज तालुक्यातील बचत गटांचा समाजशास्त्रीय अभ्यास" या संशोधन विषयाच्या अनुषंगाने मिरज तालुक्यातील एकात्म समाज केंद्राची निवड करण्यात आली. संशोधिका ही स्वतः मिरज शहरातील आहे. आणि एकात्म समाज केंद्र हे मिरजमध्ये आहे. या एकात्म समाज केंद्रामधून निवड केलेल्या गावाची नावे पुढीलप्रमाणे -


१) शहरी भाग - मिरज

२) ग्रामीण भाग - मालगाव

मिरज आणि मालगाव मधील बचतगटासंबंधी माहिती घेण्यात आली. शहरी आणि ग्रामीण भागातील काही निवडक महिलांची बचतगटासंबंधी माहिती घेण्यात आली.

मिरज आणि मालगाव मधील बचत गटासंबंधी माहिती घेण्यात आली
शहरी आणि ग्रामीण भागातील काही निवडक महिलांची बचत
गटासंबंधी माहिती घेण्यात आली




सांगली जिल्हा
शहरी आणि ग्रामीण भाग
आटपाडी
विटा (खानापूर)
शिराळा
इस्लामपूर
तासगाव
कवठेमहंकाळ
जत
सांगली
मिरज
सुचि
जिल्हा ठिकाण
तालुका ठिकाण
ग्रामीण भाग
0
10
20
30 कि.मी

सारणी क्रमांक ३.१

## शहरी आणि ग्रामीण महिला बचत गटांची आकडेवारी

| अ. न. | शहरी आणि ग्रामीण भाग | एकूण बचत गट संख्या | चालू बचत गट संख्या | बंद बचत गट संख्या | | एकूण सभासद संख्या | एकूण वर्ष पूर्ण | | | | बचत रक्कम | दंड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३ वर्ष | ५ वर्ष | | ५ वर्ष पूर्ण | ३ वर्ष पूर्ण | २ वर्ष पूर्ण | २ ते ९ महिने पर्यंत | | |
| १ | मिरज | ३४ | २८ | ३ | ३ | ५०४ | ३ | ७ | ७ | १७ | रू.३० पासून रू.१०० पर्यंत | रू.५ |
| २ | मालगाव | १० | १० | - | - | १६३ | - | ३ | ५ | २ | रू.२५ पासून रू.५० पर्यंत | रू.२ |
| | एकूण | ४४ | ३८ | ३ | ३ | ६६७ | ३ | १० | १२ | १९ | | |

अभ्यासासाठी वरील समग्रातून नमुना निवडायचा होता. वरील सर्व बचत गटातून जे बचत गट सध्या चालू आहेत अशा महिला बचत गटाची निवड केली.

## सारणी क्रमांक ३.२

### शहरी आणि ग्रामीण भागातील महिला सभासदाची निवड

| अ.न. | शहरी आणि ग्रामीण भागाची नावे | एकूण बचत गट संख्या | एकूण महिला सभासद संख्या | अध्ययनासाठी निवडलेल्या महिला |
|---|---|---|---|---|
| १ | मिरज | ४ | ७५ | ३८ |
| २ | मालगाव | ३ | ४२ | २१ |
| | एकूण - | ७ | ११७ | ५९ ✓ |

अभ्यासासाठी वरील समग्रातून नमुना निवडायचा होता. तीन वर्ष पूर्ण असणारी बचत गटाची निवड केली. संशोधनकर्ती जवळ उपलब्ध असणारी वेळ, श्रम आणि पैसा या स्वरूपातील साधनसामुग्री लक्षात घेऊन ग्रामीण आणि शहरी भागातून ५९ महिला उत्तरदात्यांची निवड संभाव्यता नमुना निवडीतील व्यवस्थाबध्द नमुना निवड पध्दतीचा वापर करून एकूण संख्येच्या ५०% ने ५९ महिला उत्तरदात्यांची निवड केली.

## सारणी क्रमांक ३.३

### शहरी भागातील महिला बचत गटांची निवड

| अ.न. | बचत गटांची नावे | एकूण महिला सभासद संख्या | अध्ययनासाठी निवडलेल्या महिला |
|---|---|---|---|
| १ | सरस्वती बचत गट | २० | १० |
| २ | प्रगती बचत गट | २० | १० |
| ३ | लक्ष्मी बचत गट | २० | १० |
| ४ | समृध्दी बचत गट | १५ | ८ |
| | एकूण | ७५ | ३८ |

अभ्यासासाठी निवडलेल्या शहरी भागातील महिला बचतगटांना तीन वर्ष

पूर्ण झालेले आहेत वरील समग्रात चार बचत गट असून त्यांची एकूण महिला सभासद संख्या ७५ आहे. या एकूण महिला सभासदामधून ३८ महिला उत्तरदात्यांची निवड केली. या महिला रू.५० या प्रमाणे बचत करतात. जर वेळेत बचत न केल्यास रू.५ प्रमाणे दंड आकारला जातो.

**सारणी क्रमांक ३.४**

**ग्रामीण भागातील महिला बचत गटाची निवड**

| अ.न. | बचत गटांची नावे | एकूण महिला सभासद संख्या | अध्ययनासाठी निवडलेल्या महिला |
|---|---|---|---|
| १ | रमामाता बचत गट | १५ | ८ |
| २ | प्रियदर्शनी बचत गट | १५ | ८ |
| ३ | सरस्वती बचत गट | १२ | ५ |
| | एकूण | ४२ | २१ |

अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण भागातील महिला बचत गटांना तीन वर्षे पूर्ण झालेली आहेत. वरील समग्रात तीन बचत गट असून त्यांची एकूण महिला सभासद संख्या ४२ आहे. या एकूण महिला सभासदामधून २१ महिला उत्तरदात्यांची निवड केली. या महिला रू.३० याप्रमाणे बचत करतात व त्यांना रू.२ प्रमाणे दंड आकारला जातो.

अशा रितीने शहरी भागातून ३८ महिला आणि ग्रामीण भागातून २१ महिला अशा एकूण ५९ महिला उत्तरदात्यांची मुलाखत घेतल्या.

### ५. तथ्य संकलनासाठी वापरलेले साधन(Instrument of Data Collection):

अभ्यासासासाठीचे उद्दिष्टे लक्षात घेऊन तथ्य संकलन करण्यासाठी एक मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली. महिला बचत गटातील महिलांची मुलाखत घेऊन अनुसूचीची पूर्वचाचणी (Pre-Testing)घेण्यात आली. योग्य त्या दुरूस्त्या करून मुलाखत अनुसूचीत काही बदल करण्यात आले आणि अंतिम अनुसूची तयार करण्यात आली.

## ६. तथ्य संकलन ( Data Collection):

संशोधनासाठी निवडलेल्या नमुन्यातील सर्व महिला संस्थांकडून सदर मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संशोधनकर्तीने स्वतः मुलाखती घेऊन माहिती संकलित केलेली आहे. तथ्य संकलनाचे काम १ जुलै २००४ ते ३१ ऑगस्ट २००४ या कालावधीत करण्यात आले. संशोधिकेने ही माहिती प्राप्त करण्यासाठी संरचीत मुलाखत अनुसूचीचा वापर केला.

## ७. माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण (Analysis and Presentation of Data) :

संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून सारण्या तयार करण्यात आल्या. सदर सारणीतील वर्गीकृत माहितीच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

## ८. संशोधनाच्या मर्यादा( Limitations of the study):

१) सदर संशोधन मिरज तालुक्यातील एकात्म समाज केंद्रापुरतेच मर्यादित आहे.

२) एकात्म समाज केंद्रातून फक्त महिला बचत गट सुरू केले जातात त्यामुळे पुरूष बचत गटाचा अभ्यास केलेला नाही.

३) प्रस्तुत अभ्यासासाठी मालगाव ग्रामीण व मिरज शहरी भागांचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

४) या अभ्यासातून आलेले निष्कर्ष हे केवळ अभ्यास क्षेत्रापुरतेच मर्यादित आहेत.

## ९. प्रकरण नियोजन ( Chapterisation Scheme):

संकलित केलेल्या माहितीचे अर्थपूर्ण संघटन करून खालील प्रकरणात अहवालाची विभागणी करण्यात आली आहे.

१) स्वयंसहाय्य बचत गट : परिचय (Self-Help Group : An Introduction)

२) मिरज तालुक्यातील एकात्म समाज केंद्राचा परिचय (Ekatma Samaj Kender In Miraj Taluka : An Introduction)

३) संशोधन समस्या आणि संशोधनाचा आराखडा (Research Problem And Research Design)

४) बचतगट आणि स्त्रियांचा विकास (Self-Help Group And Development of Woman)

५) सारांश आणि निष्कर्ष (Summary And Conclusion)

****